सत्यमेव जयते

# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे


| | |
|---|---|
| अतिरिक्त संचालक (वैयक्तिक) २६०५८९९६ | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, राजा बहादूर मिल रोड, पुणे रेल्वे स्टेशन मागे, पुणे — ४११००१, दुरध्वनी— ०२० — २६०५८७३९, २६०५८१३९, २६०५८४७६ ३wEmail - dcell9@gmail.com |
| आरोग्य सेवा | जा.क्र रा.कु.क.का /लोवमु/साफुककयो बंद/**सुधारित** माझी कन्या भाग्यश्री शानि/कक्ष ९ ड /नस्ती क्र. ११४/ ५०८३९-५९०३० /१७ दिनांक - १६/०८/२०१७ |


प्रति,
उपसंचालक, प्रभारी मंडळ, ......सर्व
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद., .....सर्व
जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय....सर्व
महानगरपालिका, ......सर्व

**विषय :- सुधारीत सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना दिनांक १.८.२०१७ पासून बंद झाले बाबत.**

संदर्भ :- महिला व बाल विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक - भाग्यश्री-२०१७/प्र.क्र.१०७/का.३ दिनांक -१ ऑगस्ट २०१७

राज्यामध्ये सवित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजना शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून राबविली जात होती. या योजनेचे स्वरुप पुढील प्रमाणे होते : अ) एका मुलीनंतर शस्त्रक्रिया केल्यास केलेल्या व्यक्तीस रु.२,०००/- रोख व मुलीच्या नांवे रु.८,०००/- राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र स्वरुपात. ब) दोन मुलींनंतर शस्त्रक्रिया केल्यास केलेल्या व्यक्तीस रु.२,०००/- रोख व प्रत्येक मुलीच्या नांवे रु.४,०००/- या प्रमाणे रु.८,०००/- ची राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र स्वरुपात देण्यात येत होते.

दिनांक १ ऑगस्ट २०१७ रोजी महिला व बाल विकास विभागाच्या निर्गमित झालेल्या शासन निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, **शासनाने माझी कन्या भाग्यश्री ही सुधारित योजना लागु केल्यामुळे सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजनेची द्विरुक्ती होत असल्याने सदर योजना बंद करण्यात येऊन एकच माझी कन्या भाग्यश्री योजना सुरु ठेवण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली असल्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाने त्याप्रमाणे आवश्यक सूचना तातडीने निर्गमित कराव्यात. तसेच, दिनांक १ ऑगस्ट २०१७ पासूनच्या प्रकरणांसाठी सदर योजना लागू आहे.**

करिता उपसंचालक आरोग्य सेवा प्रभारी मंडळ, सर्व, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व, जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा रुग्णालय व महानगरपालिका, सर्व कार्यालयांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांचे कार्यक्षेत्रांतर्गत ३१ जुलै २०१७ पर्यंत जन्मलेल्या मुलींच्या सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजनेच्या प्रकरणांचा पाठपूरावा करुन उपलब्ध अनुदानातून सदर प्रकरणातील लाभार्थींना लाभ देउन लवकरात लवकर प्रकरणांचा निपटारा करावा. केलेल्या कार्यवाहीची माहिती या कार्यालयास विहित नमून्यात सादर करावी. दिनांक १ ऑगस्ट २०१७ नंतर जन्मलेल्या मुलींची जी प्रकरणे आरोग्य संस्थेकडे किंवा कार्यालयाकडे जमा झाले असतील अशी प्रकरणे उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयाचा संदर्भ देऊन महिला व बाल विकास विभागाकडे सुपूर्त करावीत. तसेच, दिनांक १ ऑगस्ट २०१७ नंतरच्या प्रकरणासाठी लाभार्थीने विचारणा केल्यास शासन निर्णयामध्ये नमूद योग्य ते मार्गदर्शन करावे.

सोबत : संदर्भिय शासन निर्णय

**अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा**
**कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे.**

**प्रत सविनय सादर-**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मा.आयुक्त, (कु.क) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३) मा.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
४) जिल्हाधिकारी, जिल्हा ....सर्व
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
६) आयुक्त, महानगरपालिका, सर्व